CR1985120307

कर्जे __________
कर्जाचे लेखे ठेवणे.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक टीआरडब्ल्यू-२४८१/सीआर-१९१/८१/एडीएम-९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ डिसेंबर १९८५.

# परिपत्रक

कोषागार अधिका-यांमार्फत मिळालेल्या न्यूनाधिक ज्ञापनांत [Plus and Minus Memoranda ] दाखविलेल्या संवितरित रकमा व महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या रकमा यांचा मेळ बसावा या उद्देशाने महालेखापालांची मुंबई आणि नागपूर येथील कार्यालये महसूल अग्रीमे, स्थानिक संस्था आणि खाजगी व्यक्ती यांना दिलेली कर्जे इत्यादींच्या बाबतीत सध्या बृहत्पत्रक [Broad Sheets ] ठेवीत असतात. तथापि लेखा संहिता खंड २ मधील अनुच्छेद ९० खालील तरतुदींनुसार फक्त महसूल विभाग/जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेली कर्जे आणि अग्रीमाबाबतचे ज्ञापन पाठवायचे असले तरी सुध्दा महालेखापालांना बृहत्पत्रके योग्य रीत्या ठेवता यावीत म्हणून कोषागार अधिकारी अशा ब-याचशा योजनांचे ज्ञापन त्यांना पाठवीत असतात. योजनांच्या संख्येत व कर्जे मंजूर करणा-या अधिका-यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्यामुळे न्यूनाधिक ज्ञापनांचेही काम मोठ्या प्रमाणावर वाढले आहे व यामुळे अनेक योजनांच्या बाबतीत ही ज्ञापने महालेखापालांना अजिबात पाठविली जात नाहीत किंवा पाठविण्यात येत असल्यास त्यांत अनियमितता असते व चुका इत्यादी असतात. परिणामस्वरुप महालेखापालांना बृहत्पत्रके योग्य रीत्या ठेवणे शक्य होत नाही आणि साहजिकच प्रयत्न करुनही त्यांना परिस्थिती सुधारण्यात यश येत नाही.

२. म्हणून कर्जाच्या संबंधात कोषागार अधिका-यांनी महालेखापालांना न्यूनाधिक ज्ञापने पाठविणे, तसेच भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांनी बृहत्पत्रके ठेवण्याचे बंद करावे असा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. तदनुसार महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई यांचेशी विचारविनिमय करुन शासन आता असा आदेश देत आहे की :-

[१] अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेतील परि. १५५ मध्ये विहित केलेल्या प्रपत्रांच्या नमुना क्रमांक ९ मध्ये कर्जे संवितरित करणा-या अधिका-यांनी प्रत्येक महिन्याला खर्चाचे विवरणपत्र नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख यांना सादर करावयाचे असल्याने आणि

[२] विभागीय अधिका-यांना लेख्यांमध्ये समायोजन करता यावे म्हणून म. को. नि. ११५ नुसार कोषागार अधिका-यांना चलनाची तिसरी प्रत विभागीय अधिका-यांना पाठवावी लागत असल्याने यापुढे म्हणजे दिनांक १ एप्रिल १९८६ पासून कोषागार अधिका-यांनी कार्यात्मक प्रधान शीर्षाखालील [Functional Major Heads ]विविध कर्जांच्या योजना तसेच तगाई अग्रिमे याबाबत न्यूनाधिक ज्ञापन सादर करावयाची पध्दत बंद करण्यात येत आहे. तथापि लेखा संहिता खंड २ मधील अनुच्छेद ९० मधील तरतुदीन्वये महसुलाचे उदा. जिल्हाधिका-यांसारखे महसूल प्राधिकारीवर्ग वगैरेंनी मंजूर केलेली तगाई कर्जे आणि अग्रीम याबाबतची न्यूनाधिक ज्ञापने महालेखापालांनाच सादर करण्याची पध्दत वरील बाबीला अपवाद राहील. त्यानुसार क्षेत्रीय अधिकारी[Field Officers ]

व आहरण व संवितरण अधिका-यांकडून प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यन्त जमा रकमेची विवरणपत्रे मिळतात किंवा नाही, तसेच त्यावर चलन क्रमांक इत्यादी आहे की नाही याची खात्री विभाग प्रमुखाने करून घेणे आवश्यक आहे. याच विवरणपत्रांच्या सहाय्याने विभाग प्रमुख यांनी त्यांचे कार्यालयात योजना निहाय बृहत्पत्रके ठेवणे आवश्यक आहे. त्यांनी अभिलिखित केलेले आकडे आणि महालेखापालांच्या कार्यालयांत नोंदलेले आकडे यांचा प्रत्येक महिन्यात मेळ घालण्याची जबाबदारी विभाग प्रमुखावर राहील. योजने-नुसार कर्जाचा प्रत्यक्ष फायदा उपलब्ध होणा-या व्यक्तीनिहाय लेखे आपल्या हाताखालील अधिकारी नियमितपणे ठेवतील याची नियंत्रण अधिका-यांनी खात्री करून घेणे आवश्यक आहे. यामध्ये कर्जाच्या वसुलीचे लेखे ठेवण्याच्या बाबीचाही समावेश आहे.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभागीय अधिकारी अथवा त्यांच्या दुय्यम अधिका-यांनी कर्ज योजनांखाली मंजूर केलेल्या कर्जासंबंधी संपूर्ण लेखे दिनांक १-४-१९८६ पासून ते ठेवतील याची खात्री करावी. ज्या बाबतीत कर्जे मंत्रालयीन विभागांकडून मंजूर केली जातात, त्या बाबतीत कर्ज मंजुरीच्या आदेशातच अशा कर्जाचे लेखे ठेवण्यास विभाग प्रमुखांस विनिर्दिष्टपणे नामनिर्देशित केले नसल्यास, अशा कर्जाचे लेखे संबंधित मंत्रालयीन विभागाने ठेवणे आवश्यक आहे.

४. महालेखापाल, मुंबई/नागपूर व अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांनी दिनांक ३१ मार्च १९८६ पर्यन्त ठेवलेल्या बृहत्पत्रकांतील योजनावार लेख्यांतील शिलकांचाही मेळ विभाग प्रमुखांनी घालावा व त्यांच्या बृहत्पत्रकात त्यांनी ती शिल्लक प्रारंभिक शिल्लक [Opening Balance] म्हणून अंतर्भूत करावी. प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चच्या अखेरीस योजनावार असलेली शिल्लक विभाग प्रमुखांनी आपल्या प्रशासकीय विभागांना कमीत कमी संबंधित प्रतिवर्षी ३१ मे पर्यन्त कळविणे आवश्यक आहे.

५. प्रशासकीय विभागांच्या असेही निदर्शनास आणण्यात येत आहे की, मुंबई बाहेरील संस्थांना कर्जे मंजूर करताना त्यावर "अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांना देयके सादर करून प्रदान करावे" असे आदेश देणे हे महाराष्ट्र कोषागार नियम, १९ च्या तत्त्वांशी अनुरूप आणि सुसंगत नाही, अशा प्रकरणांत संस्थांची मुख्य कार्या-लये/शाखा कार्यालये जिथे आहेत तिथल्या जिल्ह्यातील कोषागारातून अशी प्रदाने केली जातील असे आदेश देणे जरुरीचे आहे. ज्यांच्या सह्या जिल्हा कोषागाराच्या अभिलेख्यांवर आहेत, अशा विभागीय अधिका-यांनाच अशा प्रकरणांतील देयके प्रति-स्वाक्षरीत करता येतील.

६. क्षेत्रीय अधिकारी त्यांची माहिती नमुना "अ" मध्ये त्यांच्या नियंत्रण अधि-का-यांना सादर करतील. ही माहिती नमुना "ब" मध्ये एकत्रित करून नियंत्रण अधि-कारी ती माहिती नमुना "क" मध्ये ठेवण्यासाठी विभागीय प्रमुखांना सादर करतील.

७. नियंत्रण अधिका-यांनी त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या कर्जाच्या ~~उप शीर्ष- आणि असलेल्या कर्जाच्या~~ उप शीर्षाखाली ठेवलेला जमा व खर्चाचा हिशेब व खालील

कार्यालयांनी त्यांच्या कार्यालयात नोंदलेल्या सदरहू कर्जाच्या रकमांच्या हिशोबांचा मेळ प्रत्येक महिन्याला घालण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे :-

[१] महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई,
[२] महालेखापाल-२, महाराष्ट्र, नागपूर आणि
[३] महाराष्ट्र शासनाचे अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

८. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

द. शि. गोडबोले,
सह सचिव, वित्त विभाग.

सोबत :- विवरणपत्राचे नमुने [अ, ब, क]

प्रत

महालेखापाल-१ [लेखा/व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-१ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता]महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-२ [लेखा परीक्षा] महाराष्ट्र, नागपूर,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभाग/कार्यालय प्रमुख,
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
उप संचालक, लेखा व कोषागारे, नागपूर/नाशिक/पुणे/औरंगाबाद.
सर्व कोषागार/उप कोषागार अधिकारी,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई,
* लोकायुक्त व उप लोकायुक्त, मुंबई,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, एडीएम-९.

---

* पत्राने.